अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | मंगळवार,दि.३० जानेवारी २०२४ | ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : १२१ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## महाराष्ट्रात एकाच दिवशी ३,१६,३०० कोटींचे सामंजस्य करार

**मुंबई** : हरित ऊर्जा आणि हरित स्टील प्रकल्प या दोन्ही क्षेत्रात आज एकाच दिवशी ३,१६,३०० कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले. यातून ८३,९०० रोजगार उपलब्ध होणार आहेत.

याशिवाय, कृषी मूल्य साखळी अंतर्गत शेतकऱ्यांना थेट बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी ॲमेझॉन, बिग बास्केट, फ्लिपकार्ट यांच्याशी करार करण्यात आले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत हे सामंजस्य करार आज सह्याद्री अतिथीगृह येथे करण्यात आले. यातील उर्जा क्षेत्रात एकूण ७ कंपन्यांशी हरित ऊर्जा निर्मितीसाठी २,७६,३०० कोटी रुपयांचे करार करण्यात आले. यातून ६३,९०० इतकी रोजगारनिर्मिती होणार आहे. यात एनटीपीसी ग्रीन एनर्जी लि. (एकूण गुंतवणूक ८०,००० कोटी/१२ हजार रोजगार), जेएसडब्ल्यू एनर्जी लि. (एकूण गुंतवणूक १५,००० कोटी/११ हजार रोजगार), अवादा ग्रीन हायड्रोजन प्रा. लि. आणि बाफना सोलार अँड इन्फ्रा. प्रा. लि. (एकूण ५०,००० कोटी रुपये गुंतवणूक/८९०० रोजगार), रिन्यू ईफ्युएल प्रा. लि. (एकूण गुंतवणूक ६६,४०० कोटी/२% हजार रोजगार), वेल्सपन गोदावरी जीएच२ प्रा. लि. (एकूण गुंतवणूक : २९,९०० कोटी/१२,२०० रोजगार), आयनॉक्स एअर प्रॉडक्टस (एकूण गुंतवणूक २५,००० कोटी रुपये/३०० रोजगार) आणि एल अँड टी ग्रीन एनर्जी टेक लि. (१०,००० कोटी रुपये गुंतवणूक/१००० रोजगार) यांचा समावेश आहे.

# बर्थडेची पार्टी सुखाची वाटली मौजमजा जिवावर बेतली

## सोलापूरच्या महावीर चौकातील थरार

**सुराज्य/सोलापूर**

सोमवारचा दिवस. वेळ मध्यरात्रीची. साधारण दीड वाजलेले. सर्वत्र निरव शांतता. रस्त्यावर रक्ताचा पडलेला सडा. तिघेजण अस्ताव्यस्त पडलेले. ८० फुटावर पडलेली दुचाकी. पोलिसांचे पेट्रोलिंग. हायमॅक्सच्या प्रकाशात हा थरार दिसला. पोलीस पटापट खाली उतरले. तिघे तरूण रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे पाहिले. त्यांचा अंगाचा थरकाप उडाला. त्यांच्यातली मानवता जागी झाली. लागलीच त्यांना ॲम्बुलन्समधून सिव्हिलला नेले. मात्र उपचारापूर्वीच त्यांनी जीव सोडला होता. सोलापुरातील जुना होटगी नाका येथील महावीर चौकातील हा मन हेलावून टाकणारा प्रसंग. ट्रीपलसीटवरील दुचाकी डिव्हाडर आणि त्यानंतर झाडावर आदळून जुळे सोलापूरमधील तिघा जिवलग मित्रांचा जागीच मृत्यू झाला. त्यातील एका मित्राचा वाढदिवस होता. तिघांनी मस्तपैकी 'एन्जॉय' केला. त्यानंतर मध्यरात्री होटगीरोडवरून गांधीनगरकडे जाताना या सुसाट बाईकने त्यांचा जीव घेतला. इरण्णा बसवलिंगप्पा मठपती (२३ वर्षे, रा. गुरुदेव दत्त नगर, जुळे सोलापूर), निखिल मारुती कोळी (वय २३ वर्षे, रा,अक्षय सोसायटी, जुळे सोलापूर), दिगविजय श्रीधर सोमवंशी (वय वर्षे २१, रा. अक्षय सोसायटी, जुळे सोलापूर) अशी मरण पावलेल्या या तीन तरूणांची नावे आहेत.

या तिघांनी एन्जॉय कुठे केला. हे तिघे दुचाकीवरून कुठे निघाले होते,याचा तपास पोलीस करत आहेत. मध्यरात्रीच्या सुमारास हे तिघे रक्ताच्या थारोळ्यात पडले होते. त्यांची बाईक ऐंशी फुटावर उडून पडली होती. पहिल्यांदा डिव्हायडरला धडकली आणि नंतर ती गाडी झाडावर आदळली असावी,असा पोलिसांचा अंदाज आहे. इरण्णाचा वाढदिवस होता.आम्ही पार्टीला जातो,असे त्याने घरात सांगितले. त्यानंतर तिघेही मित्र रविवारी रात्री घराबाहेर पडले.

तिघांचे मृतदेह छिन्नविच्छिन्न अवस्थेत भर चौकात पडले होते. मध्यरात्री पेट्रोलिंग करणाऱ्या पोलिसांच्या नजरेस हे मृतदेह पडले आणि तिघांना शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. अपघाताची माहिती कळताच नातेवाईकांनी सोमवारी सकाळी शासकीय रुग्णालयात प्रचंड गर्दी केली.

## सुसाट दुचाकी डिव्हाडर-झाडावर आदळून जुळे सोलापूरमधील तिघे जिवलग मित्र ठार



निखील कोळी



ईरण्णा मठपती



अतिश सोमवंशी

**'ब्लॅक स्पॉट' :** यापूर्वी अनेक अपघात या ठिकाणी झाले आहेत. पाच ते सहा महिन्यांपूर्वी एका पोलिसाचा मुलगा याच ठिकाणी अपघातात दगावला असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले. कारण या ठिकाणी आतापर्यंत जितके अपघात झाले आहेत, त्या अपघातात अनेकांच्या जीव गेला आहे.म्हणून या ठिकाणाला 'ब्लॅक स्पॉट' म्हणले जात आहे. वाहनधारकांनी या ठिकाणाहून जाताना अतिवेगाने जावू नये व काळजीपूर्वक आपले वाहन चालवावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

**७०-८० फुटावर दुचाकी आदळली :** हा अपघात महावीर चौकातील लेन्सकार्ट या शोरूमच्या अपोझिट साईडला झाला. दुचाकी ही अति वेगात असल्याने सर्वप्रथम रस्ता दुभाजकाला धडकून ७०-८० फुटापर्यंत जावून तेथील एका झाडावर आदळली. हा अपघात इतका भीषण होता की,तिघे मित्र वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन आदळले. तिघांच्या डोक्याला जबरदस्त मार लागला,अपघात स्थळी ते रक्तबंबाळ अवस्थेत निपचित पडल्याचे दिसले.

**आक्रोश आणि हुंदके... :** निखिल कोळी आणि इरण्णा मठपती हे घरात एकुलते एक होते. इरण्णा हा दुचाकी शोरूममध्ये नोकरीला होता, तर दिग्विजय सोमवंशी याचा कटिंग दुकानाचा व्यवसाय होता. तिघांवरही कुटुंबाची जबाबदारी होती. नातेवाईकांचा व मित्र मंडळीचा प्रचंड आक्रोश आणि हुंदके शासकीय रुग्णालयात पाहावयास मिळाले. सदर बझार पोलीस ठाण्यात या अपघाताची नोंद झालीय.

### नंबर प्लेट वरून काढली माहिती

पेट्रोलिंग करत असताना ही घटना सर्वप्रथम सहायक पोलीस निरिक्षक दिनेश कुलकर्णी यांना दिसली. त्यावेळी त्यांनी पोलीस कॉन्स्टेबल अनमोल लट्टे व चालक नंदकुमार व्होटकर यांच्या मदतीने अपघातग्रस्तांच्या खिशातील कागदपत्रे तपासली.दरम्यान,या अपघाताची माहिती सदर बझार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राघवेंद्र क्षीरसागर यांना समजताच त्यांनी देखील घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर दिग्विजय सोमवंशी याच्या जवळील असलेल्या लायसन्सवरून गाडीचा नंबर ट्रेस करून सोमवंशी यांच्या घरच्यांना अपघाताची माहिती कळवली.तसेच सर्वप्रथम ॲम्बुलन्स बोलून अपघातग्रस्तातील तिघांना सिव्हिल हॉस्पिटलला पाठवले. पोलिसांनी देखील तत्काळ अपघातग्रस्तांच्या घरी गाडी पाठवून त्यांना घटनास्थळी आणून सिव्हिल हॉस्पिटलला नेले.

### इरण्णा याचा होता वाढदिवस

या घटनेतील मयत इरण्णा याचा सोमवारी वाढदिवस होता.त्यानंतर हे तिघे घरच्यांना पार्टीला जातो असे सांगत घरातून बाहेर पडले. परंतु क्रूर नियतीने तीनही मित्रांच्या आई-वडिलांना पोरके केले.तिघाही मित्रांच्या नातेवाईकांचा हा हुंदका होता. निखिल कोळी आणि इरण्णा मठपती हे त्या-त्या कुटुंबातील एकुलते एक होते. इरण्णा मठपती दुचाकी शोरूममध्ये कामाला होता, तर दिग्विजय सोमवंशी याचा केश कर्तनालयाचा व्यवसाय होता. तिघांवरही कुटुंबाची जबाबदारी होती. मात्र, त्या अपघातात तिघांना आपला जीव गमवावा लागला. या अपघाताच्या आघाताने तिन्ही कुटुंबाच्या आधारकर्त्यांना काळाने हिरावून नेले. सोमवारी शासकीय रूग्णालयात सकाळी नातेवाईकांचा व मित्र मंडळींचा आक्रोश हृदय हेलावणाराच होता.सकाळी शवविच्छेदन झाल्यानंतर त्या तिघांचे मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले.

## सोलापुरात तोतया कर्मचाऱ्याकडून मराठा सर्वेक्षणाचे काम सुरु

### पालिकेच्या नियुक्त कर्मचाऱ्यांचा प्रताप, फौजदारी गुन्हा करण्याची मागणी

**सुराज्य/सोलापूर**

मराठा आरक्षणासाठी शासन आणि मुख्यमंत्री गंभीर असताना मागासवर्गीय आयोगाच्या वतीने मराठा समाजाचे मागासलेपणा तपास करण्यासाठी महापालिका क्षेत्रात करण्यात येणाऱ्या सर्व्हे मध्ये भोगसगिरी आढळून येत आहे.

सोलापूर महापालिकेच्या ज्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे. त्यांनी एका तोतया कर्मचाऱ्याची नियुक्ती करण्याचा प्रताप केला आहे. हा प्रकार मराठा समाजाचे समन्वयक अनंत जाधव यांनी उघड केला आहे. या प्रकाराचा तपास करून त्या कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी मागणी पालिका प्रशासनाकडे केली आहे. मराठा आरक्षणासाठी राज्यात वातावरण पेटले आहे. मनोज जरांगे यांनी मुंबईत दाखल झाल्यानंतर राज्यशासनाने आरक्षणाची हामी दिली आहे. तर राज्य मागासवर्ग आयोगाच्या सूचनेप्रमाणे शहर जिल्ह्यात २३ ते ३१ जानेवारी २०२४ या कालावधीत मराठा समाज व खुल्या प्रवर्गाचे प्रत्येक गावात शहरातील प्रभागात जाऊन घर निहाय सर्व्हेक्षण करण्यात येत आहे. गेली सात दिवस झाले हा सर्व्हे चालू आहे. मात्र सर्वत्र सावळा गोंधळ चालू असल्याचे निदर्शनास येत आहे. मंडई विभागातील अनिल खरटमल या कर्मचाऱ्याने सर्व्हे साठी स्व:ता नजाता एका कर्मचाऱ्यांची केली आहे. त्या तोतया कर्मचाऱ्याला आपण काय करता आहे? कशाचा सर्व्हे करत आहोत. यांची माहिती नाही कोणते प्रश्न विचारावे ? डाटा कसा गोळा करावा यांचे प्रशिक्षण नाही त्यामुळे अशा प्रकारे सर्व्हे होत असेल तर मराठा समाजाचे मागासले पण सिद्ध होण्यासाठी किंवा डाटा पुढे येण्यासाठी अडचणींना सामोरे जावे लागेल त्यामुळे मराठा समाजातून मोठी नाराजी व्यक्त होत आहे.



तोतया कर्मचारी

हा प्रकार माझ्या निदर्शनास आल्यानंतर या तोतया कर्मचाऱ्याची माहिती उपायुक्त निखिल मोरे आणि झोन अधिकाऱ्यांना दिली आहे. या प्रकरणात ज्या कर्मचाऱ्याने हा प्रकार करत तोतया कर्मचाऱ्याची नियुक्ती केली आहे. त्या कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा.



**- अनंत जाधव**
(माजी नगरसेवक)

## चेक बाऊन्स केल्याप्रकरणी आठ लाखाचा दंड

**मोहोळ** : चेक बाउन्स केल्याप्रकरणी मोहोळच्या फौजदारी न्यायालयात खाजगी फिर्याद दाखल केली होती. न्यायालयाने संबंधित चेक बाउन्स करणाऱ्याला ८ लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे.

शेजबाभुळगाव ता. मोहोळ येथील फिर्यादी नेताजी बबन गवळी व राजेंद्र महादेव म्हमाणे यांचे ओळखीचे संबंध होते. त्या ओळखीच्या संबंधातून फिर्यादीने राजेंद्र म्हमाणे यास ६ लाख ५० हजार हातउसने दिलेले होते, ती रक्कम राजेंद्र म्हमाणे याने रोख स्वरूपात परत न देता फिर्यादी नेताजी गवळी यांना त्या रकमेचा चेक दिलेला होता. तो चेक गवळी यांनी बँकेत भरल्यानंतर बाउन्स झाला म्हणून फिर्यादी गवळी यांनी मोहोळ येथील वर्ग एक यांचे न्यायालयात फिर्याद दाखल केलेली होती. सुनावणी होऊन मोहोळ न्यायालयाचे मुख्य



न्यायाधीश एस. डब्लू. ठोंबरे यांनी दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकून घेऊन म्हमाणे यास ८ लाख रुपये दंडाची शिक्षा ठोठावली व सदरची रक्कम म्हमाणे याने भरल्यानंतर फिर्यादीस द्यावी तसेच दंडाची रक्कम न भरल्यास आरोपीस ६ महिने तुरुंगवासाची शिक्षा ठोठावली आहे. या केसमध्ये फिर्यादी तर्फे ॲड. कैलास नाईक, ॲड. आकाश कापुरे, ॲड. शुभम मोटे, ॲड. अक्षय राऊत यांनी काम पाहिले.

## थम्सअपमध्ये विषारी पावडर मिसळून बापाने घेतला मुलाचा जीव

**सुराज्य/सोलापूर**

थम्सअप मध्ये सोडियम नायट्रेटची विषारी पावडर मिसळून बापाने स्वतः च्या मुलाचा जीव घेतल्याची धक्कादायक घटना सोलापुरात घडली आहे.ही घटना दि.१३ जानेवारी २०२४ रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास सोलापूर तुळजापूर हायवे रोडवरील सर्विस रोड लगतच्या नाल्याजवळ घडली.

याप्रकरणी मुलाची आई कीर्ती विजय बद्दू (वय-३३, रा.भवानी पेठ, सोलापूर) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे त्यांच्या फिर्यादीवरून मुलाचे वडील विजय सिद्राम बद्दू (वय-४३, रा.भवानी पेठ) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी यांचे पती विजय याने मुलगा विशाल विजय बद्दू (वय-१४) याला त्याच्या शाळेतील सततच्या तक्रारी, अभ्यास न करणे, घरात व शाळेत खोड्या करणे, सतत मोबाईल पाहणे, याचा राग मनात धरून वरील ठिकाणी निर्मनुष्य असताना दुचाकीवरून घेऊन जाऊन त्याला थम्सअप मध्ये सोडियम नायट्रोटची विषारी पावडर मिसळून मुलगा विशाल यास पाजून जीवे ठार मारले आहे. असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक जगताप हे करीत आहेत.

**बापाने दिली कबुली :** यात मयत मुलाच्या वडिलाने म्हणजेच संशयित आरोपीने दिलेली माहिती अशी की, मुलगा विशाल हा शाळेत व शेजारील लोकांसोबत सतत खोड्या करायचा व त्याचे शाळेतील सततच्या तक्रारी, अभ्यास न करणे,घरात व शाळेत खोड्या करणे,सतत मोबाईल पाहणे याचा राग मनात धरुन वरील वेळी व ठिकाणी निर्मनुष्य ठिकाणी मोटार सायकलवर घेवून जावुन त्यास थम्सअपमध्ये सोडीयम नायट्रेटची विषारी पावडर मिसळून मुलगा विशाल यास पाजवून जीवे ठार मारल्याची कबुली बापाने दिली असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले.

## तरुणाच्या मृत्यू प्रकरणी ५ जणांवर गुन्हा दाखल

**पंढरपूर** : चिंचोली भोसे येथील भीमा नदीच्या पात्रामध्ये अवैध वाळू उपसा करताना वाळूच्या ढिगारा अंगावर कोसळून राम अनिल धोत्रे (वय १९ रा.अनिलनगर, पंढरपूर) हा तरुण मयत झाला होता.त्याच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी पंढरपूर तालुक्याच्या पोलिसांनी ५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करून काही जणांना अटक करून पोलीस कोठडी घेतली आहे.

पोलिसांनी आकाश बबन शिंदे, राज विलास मोहिते, पिंकी उर्फ विलास मारुती जाधव, बबलू वैरागकर आणि राजू नेमाडे (सर्व रा.पंढरपूर) अशा पाच जणांविरुद्ध मृत्यूस कारणीभूत ठरल्याचा गुन्हा दाखल केला. शनिवारी पहाटेच्या सुमारास वरील आरोपींनी राम धोत्रे याला वाळूचा उपसा करण्यासाठी नदीपात्रात नेले होते. त्यावेळीहा प्रकार घडला.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



ते कधी कधीच एकत्र येतात !

कल्याण
**568-91-489**

मुंबई
**249-58-233**

## महायुतीचा मार्ग सुकर तर पवार-ठाकरेंसाठी खडतर

**सुराज्य/मुंबई**

**महाराष्ट्रातील राज्यसभेच्या सहा जागांसाठी २७ फेब्रुवारीला निवडणूक होणार आहे. या निवडणुकीत विधानसभेतील आमदारांच्या संख्याबळाच्या आधारे भाजपचे तीन, काँग्रेस, राष्ट्रवादी (अजित पवार गट) आणि शिवसेनेच्या शिंदे गटाचा प्रत्येकी एक उमेदवार सहजपणे निवडून येऊ शकतो. शिवसेना ठाकरे गट आणि राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे खासदार निवृत्त होत असले तरी पक्षातील फुटीमुळे या दोन्ही पक्षांना जागा मिळणार नाही, असे दिसते.**





### राज्यसभा निवडणूक

निवृत्त होणाऱ्या सदस्यांमध्ये भाजपचे तीन, काँग्रेस, शिवसेना (ठाकरे गट) आणि राष्ट्रवादी (शरद पवार गट) प्रत्येकी एका सदस्याचा समावेश आहे. हे संख्याबळ कायम राहणार असले तरी फाटाफुटीमुळे शिवसेना शिंदे गट तर राष्ट्रवादीतील अजित पवार गटाला प्रत्येकी जागा मिळेल. याचाच अर्थ शिवसेना उद्धव ठाकरे गट आणि राष्ट्रवादीतील शरद पवार गटाला आपापली जागा कायम राखता येणार नाही.

दोन वर्षांपूर्वी राज्यसभा आणि विधान परिषद निवडणुकीतच एकनाथ शिंदे यांनी पुकारलेल्या बंडामुळे महाविकास आघाडीचे सरकार कोसळले होते. यंदा निवडणूक बिनविरोध होण्याची चिन्हे आहेत. २०२२ मध्ये राज्यसभेच्या सहा जागांसाठी झालेल्या निवडणुकीत शिवसेनेची मते फुटल्याने पक्षाचे अधिकृत उमेदवार संजय पवार पराभूत झाले होते. भाजपकडे पुरेशी मते नसतानाही धनंजय महाडिक हे निवडून आले होते. राज्यसभा निवडणुकीच्या वेळीच महाविकास आघाडीचे सरकार पडण्याची प्रक्रिया सुरू झाली होती. राज्यसभेनंतर दहाच दिवसांनी झालेल्या विधान परिषद निवडणुकीच्या दिवशी एकनाथ शिंदे यांनी बंड केले आणि उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील सरकार कोसळले होते. यंदा राज्यसभा निवडणुकीत निवडून येण्यासाठी पहिल्या पसंतीच्या ४१.०१ मतांची आवश्यकता असेल. भाजपचे गोवर्धन शर्मा यांच्या निधनाने विधानसभेतील एक जागा रिक्त आहे. भाजपचे १०४ आमदार असले तरी १३ अपक्ष व अन्य छोट्या पक्षांच्या मदतीने भाजपला तीन जागा सहजपणे मिळू शकतात. काँग्रेसचे ४५ आमदार असल्याने या पक्षाचा एक उमेदवार निवडून येण्यात काहीच अडचण येणार नाही.

शिवसेनेतील फुटीनंतर एकनाथ शिंदे यांना ४० पक्षाच्या आमदारांचा पाठिंबा असून, अपक्ष व छोट्या पक्षांचे १० जण बरोबर आहेत. या संख्याबळाच्या आधारे शिंदे गटाचा एक उमेदवार निवडून येईल. राष्ट्रवादीच्या ५३ पैकी ४३ आमदारांचा पाठिंबा असल्याचा दावा अजित पवार गटाकडून केला जातो. या संख्याबळाच्या आधारे अजित पवार गटाला एक जागा सहजपणे मिळू शकते. उद्धव ठाकरे गटाकडे १५ तर शरद पवार गटाकडे १० आमदार आहेत. दोन्ही पक्ष एकत्र येऊन संयुक्त उमेदवार उभा केला तरी ४१ हा जादुई आकडा गाठणे सद्यस्थितीत कठीण दिसते. यामुळे शरद पवार गट आणि उद्धव ठाकरे गटाला राज्यसभेतील आपापल्या जागा गमवाव्या लागणार आहेत.

### निवृत्त होणारे खासदार

नारायण राणे, प्रकाश जावडेकर, व्ही. मुरलीधरन (भाजप), कुमार केतकर (काँग्रेस), अनिल देसाई (शिवसेना ठाकरे गट), वंदना चव्हाण (राष्ट्रवादी शरद पवार गट)

### मतांचा कोटा कसा निश्चित होतो ?

सहा जागांसाठी मतदान असल्याने २८७ (एक जागा रिक्त) भागीले सात = ४१ अधिक.१ म्हणजे कोटा ४१.०१